# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

## प्रौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा विभाग


जा. क्र. प्रौनिशिवि/ ३४ / २०१५ दि. ०६/०८/२०१५

प्रति,

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली संलग्नित महाविद्यालयांचे सर्व सन्माननीय प्राचार्य
आणि पदव्युत्तर शैक्षणिक विभागांचे सन्माननिय विभाग प्रमुख

**विषय :— महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना द्यावयाच्या प्रोत्साहनपर गुणासंबंधीची मार्गदर्शक तत्वे (Guidelines) २०१५—२०१६ आणि उपक्रमांच्या मार्गदर्शक संहिता.**

महोदय/महोदया,

गोंडवाना विद्यापीठाच्या प्रौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा विभागाअंतर्गत घेण्यात येणाऱ्या उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांना गोंडवाना विद्यापीठ निर्देश क्रमांक १६१(२०१३) व निर्देश क्रमांक १७९(२०१५) नुसार प्रोत्साहनपर १० पैकी गुण देण्यासंबंधीची मार्गदर्शक तत्वे व उपक्रमांच्या मार्गदर्शक संहिता प्रौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा मंडळाने सत्र २०१५—२०१६ करीता निर्धारित केली आहेत. प्रस्तुत मार्गदर्शक तत्वे व उपक्रमांच्या मार्गदर्शक संहिता निर्गमित करण्यासाठी मा. कुलगुरुंनी मान्यता प्रदान केली आहे.

मार्गदर्शक संहितेनुसार लोकसंख्या शिक्षण कार्यक्रम आणि महिला अध्ययन व सेवा केन्द्रात कोणत्याही विद्याशाखेचे प्रथम वर्षाचे विद्यार्थी सहभागी करुन घ्यावेत. सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना माहिती संकलन आणि समाज विकासात संतांचे योगदान (संकलन वही) तयार करणे अनिवार्य आहे. विभागाच्या वतीने संकलन वह्यांचे तज्ज्ञ समितीकडून मुल्यमापन झाल्यानंतर महाविद्यालयाने सादर केलेल्या प्रोत्साहनपर १० पैकी गुणांची शिफारस विद्यापीठाच्या परिक्षा विभागाकडे करण्यात येईल.

आपणांस विनंती आहे की, सत्र २०१५ — २०१६ मध्ये उपरोक्त उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांकडून रु. ५०/— नामांकन शुल्क आकारुन त्यापैकी रु. ३०/— प्रती विद्यार्थी नोंदणी शुल्काचा धनाकर्ष (डी.डी.) सहभागी विद्यार्थ्यांच्या यादीसह आणि प्रस्तावासह विभागाकडे दि. ३० सप्टेंबर २०१५ पर्यंत पाठविण्यात यावा आणि जमा केलेल्या राशीची पावती घ्यावी. प्रस्तुत धनाकर्ष (डी.डी.) Director , Department of Adult and Continuing Education and Extension Services, Gondwana University, Gadchiroli या नांवे असावा. उपक्रमांची सविस्तर माहिती मार्गदर्शक संहितेमध्ये दिलेली आहे. मार्गदर्शक संहिता विद्यापीठाच्या www.unigug.org / www.gondwana.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी ७७७४०२७६६१ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

संचालक (प्रभारी)
प्रौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा विभाग

संचालक
प्रौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्र :

१) प्रौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा विभागाने प्रोत्साहनपर गुणासंबंधीची सत्र २०१५—१६ करीता निर्धारित केलेली मार्गदर्शक तत्वे.
२) माहिती संकलन प्रकल्प मार्गदर्शक संहिता.
३) समाजविकासात संतांचे योगदान मार्गदर्शक संहिता.
४) लोकसंख्या शिक्षण कार्यक्रम मार्गदर्शक संहिता.
५) महिला अध्ययन व सेवा केन्द्र मार्गदर्शक संहिता.
६) प्रस्ताव अर्ज (नमुना प्रपत्र).

# प्रौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा विभागाद्वारे महाविद्यालयीन स्तरावर राबविण्यात येणाऱ्या योजनांची मार्गदर्शिका

# आणि

# विद्यार्थ्यांना द्यावयाच्या प्रोत्साहनपर गुणांसाठी निर्धारित केलेली मार्गदर्शक तत्वे

## २०१५ – २०१६

### (१) प्रोत्साहनपर गुणांसाठी निर्धारित केलेली मार्गदर्शक तत्वे (Guidelines):

गोंडवाना विद्यापीठ निर्देश क्र. १६१ (२०१३) आणि निर्देश क्र. १७९ (२०१५) नुसार प्रौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा कार्यात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर गुण (Incentive Marks) देण्यासंबंधीची मार्गदर्शक तत्वे व उपक्रमांच्या मार्गदर्शक संहिता दरवर्षी निर्धारित करावयाची असतात. त्यानुसार सत्र २०१५ – २०१६ करिता नविन मार्गदर्शक तत्वे व उपक्रमांच्या मार्गदर्शक संहिता आणि कार्यक्रमांचे नियोजन करण्याकरिता प्रौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा मंडळाने सत्र २०१५–२०१६ करीता निर्धारित केली आहेत. प्रस्तुत मार्गदर्शक तत्वे व उपक्रमांच्या मार्गदर्शक संहितांची अंमलबजावणी सन २०१५–२०१६ या सत्रात करण्यासाठी मा. कुलगुरुंनी मान्यता प्रदान केली आहे.

या विभागाद्वारा चालविण्यात येणाऱ्या लोकसंख्या शिक्षण, महिला अध्ययन व सेवा केंद्र या उपक्रमात महाविद्यालयातील कोणत्याही विद्याशाखेतील पदवी अभ्यासक्रमाच्या फक्त प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनाच सहभागी करण्यात यावे. **(उदा. बी. ए. भाग–१, बी. कॉम. भाग–१, बी. एससी. भाग–१, बी. एस. डब्ल्यु. भाग–१, एम. ए. भाग–१, एम. कॉम. भाग–१, एम. एससी. भाग–१, एम. एस. डब्ल्यु. भाग–१** याप्रमाणे.)

१. लोकसंख्या शिक्षण मंडळ आणि महिला अध्ययन व सेवा केंद्र या उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांकडुन रु. ५०/– (रुपये पन्नास) प्रति विद्यार्थी नामांकन शुल्क म्हणून आकारण्यात यावे. या शुल्कामधून प्रति विद्यार्थी रु. ३०/–(रुपये तीस) याप्रमाणे प्रौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्याकडे वळते करावे. प्रौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा विभागाकडे वळते केलेल्या नामाकन शुल्काच्या राशीचा धनाकर्ष **(Demand Draft) Director , Department of Adult and Continuing Education and Extension Services, Gondwana University, Gadchiroli** या नावे असावा. प्रस्तुत धनाकर्ष विद्यापीठाच्या विभागामध्ये जमा करावा व त्यासोबत सहभागी विद्यार्थ्यांची यादी आणि प्रस्ताव अर्ज जोडण्यात यावे. जमा केलेल्या राशीची पावती घ्यावी.

२. नामांकन शुल्कातील उर्वरित राशी प्रति विद्यार्थी रु २०/–(वीस रुपये) प्रमाणे महाविद्यालयाने स्वत:कडे ठेवून या राशी मधून महाविद्यालयीन स्तरावरील लोकसंख्या शिक्षण मंडळ आणि महिला अध्ययन व सेवा केंद्राच्या कार्यक्रमासाठी खर्च करावा.

३. लोकसंख्या शिक्षण मंडळ आणि महिला अध्ययन व सेवा केंद्रात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना माहिती संकलन आणि समाज विकासात संतांचे योगदान प्रकल्पासाठी एक संकलन वही तयार करणे अनिवार्य आहे. प्रस्तूत संकलन वहीमध्ये माहिती संकलनाच्या मार्गदर्शक संहितेत नमुद केलेल्या कोणत्याही दोन विषयावरील २० बातम्या, ४ लेख, २ अग्रलेख आणि १० वाचक संवाद यांचे संकलन वर्तमानपत्रे व नियतकालीके यातून करण्यात यावे. संकलनासाठी दि. १ जानेवारी २०१५ ते ३१ डिसेंबर २०१५ या कालावधीतील वर्तमानपत्रे व नियतकालीके उपयोगात आणावीत.

४. समाज विकासात संतांचे योगदान प्रकल्पाच्या मार्गदर्शक संहितेत नमूद केल्यानुसार त्यावर एक लेख स्वत:च्या हस्ताक्षरात लिहिण्यात यावा.

५. संकलन वही महाविद्यालयातील कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करावयाची असून ती महाविद्यालयाकडे दि. १५ जानेवारी २०१६ पर्यंत सादर करणे अनिवार्य राहील. विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या संकलन वहीवर महाविद्यालयाचे प्राचार्य आणि कार्यक्रम अधिकारी यांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांनी तयार केलेली संकलन वही कार्यक्रम अधिकाऱ्यानी तपासून त्यावर **उत्कृष्ट, चांगला आणि साधारण** यापैकी एक अभिप्राय नमूद करणे आवश्यक आहे.

६. विद्यार्थ्यांच्या संकलन वह्यांचे मुल्यमापन प्रौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा विभागाच्या वतीने संकलन वह्यांचे

मुल्यमापन जानेवारी – फेब्रुवारी २०१६ मध्ये तज्ज्ञ समितीकडून करण्यात येईल. त्यानंतर सहभागी विद्यार्थ्यांना १० पैकी प्रोत्साहनपर गुणांची शिफारस करण्यात येईल. सर्व महाविद्यालयांना २५ जानेवारी २०१६ पर्यंत मुल्यमापनाचे सविस्तर वेळापत्रक पाठविण्यात येईल.

८. प्रोत्साहनपर गुणांची विभागणी पुढीलप्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| अ | **माहिती संकलन:**(२० बातम्या, ४ लेख, २ अग्रलेख आणि १० वाचक संवाद संकलन वहीत चिपकवून त्यावर वर्तमानपत्राचे/नियतकालिकाचे नाव, दिनांक आणि स्वत:चा अभिप्राय लिहावा.) (विद्यार्थ्यांनी केलेले प्रत्यक्ष कार्य ०२ गुण व अभिप्रायासह अअहवाल २ गुण याप्रमाणे) | ४ पैकी |
| ब | समाज विकासात संतांचे योगदान (यावरील एक लेख स्वहस्ताक्षरात संदर्भ ग्रंथासहीत लिहावा) | २ पैकी |
| क | महाविद्यालयानी द्यावयाचे गुण (कार्यक्रमातील सहभागावर) | ४ पैकी |
| | एकुण गुण | १० पैकी |

९. महाविद्यालयानी नमूद 'क' मध्ये द्यावयाच्या गुणांसाठी विद्यार्थ्यांनी शैक्षणिक सत्रातील आठ (८) रविवारी दत्तक गावामध्ये/वस्तीमध्ये जाऊन प्रत्यक्ष कार्य करावे. त्यासाठी लोकसंख्या शिक्षण मंडळातील विद्यार्थ्यांनी लोकसंख्या शिक्षणाच्या मार्गदर्शन संहितेत दिलेले उपक्रम ग्रामीण स्तरावर अथवा वस्तीपातळीवर आयोजीत करावे. महिला अध्ययन व सेवा केंद्रात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी महिला अध्ययन व सेवा केंद्राच्या मार्गदर्शक संहितेत नमूद केलेल्या विषयांवर कार्यक्रमांचे आयोजन महाविद्यालयीन आणि वस्ती पातळीवर आयोजीत करावे.

१०. विद्यार्थ्यांच्या प्रोत्साहनपर गुणांसाठी महाविद्यालयांना मा. परीक्षा नियंत्रक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्याकडे प्रोत्साहनपर गुणांची शिफारस करावयाची आहे. त्यासाठी तज्ज्ञ समितीकडुन प्राप्त झालेले प्रोत्साहनपर गुण संबंधीत महाविद्यालयाच्या कार्यक्रम अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे आसन क्रमांक प्राप्त होताच विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या प्रपत्रामध्ये Online upload करावे व त्याची Print प्राचार्यांच्या आणि कार्यक्रम अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीसह मा. परीक्षा नियंत्रक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्याकडे त्वरीत पाठविण्यात यावे. दुय्यम प्रत संचालक 'प्रौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा' विभागाकडे छानणी व माहितीसाठी सादर करावी.

## (२) माहिती संकलन प्रकल्प मार्गदर्शक संहिता

१. महाविद्यालयीन स्तरावरील लोकसंख्या शिक्षण मंडळ आणि महिला अध्ययन व सेवा केंद्र कार्यक्रमात सहभागी विद्यार्थ्यांनी प्रोत्साहनपर गुणांसाठी माहिती संकलन वही तयार करणे अनिवार्य आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांनी खालीलपैकी कोणत्याही दोन विषयांची निवड करावी.

   १) वाढती लोकसंख्या, समस्या व उपाय, २) पर्यावरण, ३) क्रिडा जगत, ४) महिला सक्षमीकरण,
   ५) जेष्ठ नागरीक, ६) शिक्षण विषयक, ७) रोजगार विषयक, ८) बालकांचे प्रश्न आणि उपाय
   ९) जाहिरात, १०) राजकीय नेतृत्व, ११) आरोग्य विषयक, १२) स्त्रियांवरील अत्याचार १३) विज्ञान व तंत्रज्ञान

२. निवड केलेल्या विषयावरील दैनिक वृत्तपत्रे (Newspapers) आणि नियतकालिके (Magazines) इत्यादींमध्ये प्रसिद्ध झालेल्या २० बातम्या (News), ४ लेख (Articles), १ अग्रलेख (Editorials) आणि १० वाचक संवाद इत्यादींचा संग्रह विद्यार्थ्यांनी संकलन वहीमध्ये चिकटवून त्यावर वर्तमानपत्राचे/ नियतकालिकाचे नाव, तारीख व स्वत:चा अभिप्राय नोंदविणे अनिवार्य आहे.

३. प्रस्तूत संकलनासाठी १जानेवारी २०१५ ते ३१ डिसेंबर २०१५ या कालावधीतील वर्तमानपत्रे अथवा नियतकालिकांचा उपयोग करणे आवश्यक आहे. संकलन वही तयार करताना विषयांची निवड, बातम्यांची निवड दर्जेदार असावी. तसेच कामाच्या सुबत्तेकडे विशेष लक्ष केंद्रित केलेले असावे.

४. विद्यार्थ्यांनी वरील निकषानुसार तयार केलेली संकलन वही महाविद्यालयातील कार्यक्रम अधिकाऱ्यांनी तपासून त्यावर उत्कृष्ट, चांगला किंवा साधारण असा शेरा नोंदवून स्वाक्षरी करावी.

५. प्रत्येक संकलन वही प्राचार्यांनी प्रमाणित करुन त्यावर स्वाक्षरी आणि महाविद्यालयाचा शिक्का असावा.

६. दिनांक ३१ डिसेंबर २०१६ पर्यंत सर्व विद्यार्थ्यांच्या संकलन वह्या महाविद्यालयामध्ये संग्रही असणे आवश्यक आहे. २५ जानेवारी २०१६ नंतर संकलन वह्यांचे मूल्यमापन विद्यापीठाच्या विभागाच्या वतीने करण्यात येईल.

## (३) समाज विकासात संतांचे योगदान प्रकल्प मार्गदर्शक संहिता

महाविद्यालयीन विद्यार्थी हा विद्यापीठाचा केंद्रबिंदू असल्यामुळे विद्यार्थ्यांपर्यंत संतांचे कार्य पोचणे क्रमप्राप्त ठरते. संतांनी अध्यात्म आणि विज्ञान यांचा समन्वय साधून लोक जागृतीचे व आदर्श ग्राम निर्मितीचे कार्य केले आहे. ग्राम विकास कार्यक्रमांची शिक्षण क्षेत्रामध्ये आज अभ्यास करण्याची गरज आहे. प्रौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा मंडळाने मा. कुलगुरुंच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी प्रस्तूत प्रकल्प सुरु केला आहे. व्यक्तीविकास आणि ग्रामविकासाची दृष्टी संतांच्या साहित्यात असल्यामुळे **समाज विकासात संतांचे योगदान** या विषयावर प्रत्येक विद्यार्थ्याने एक स्वतंत्र लेख स्वहस्ताक्षरात लिहिणे अनिवार्य आहे. प्रस्तूत लेख लिहिताना विद्यार्थ्यांनी संतांचे साहित्य वाचणे आवश्यक आहे. लेखाची शब्द मर्यादा किमान १२०० शब्दांची असावी. लेख कागदाच्या एका बाजूस पुरेसा समास सोडून सुवाच्छ अक्षरात लिहिण्यात यावा. लेखाच्या खाली संदर्भ ग्रंथ देण्यात यावे. उदा. संत गाडगे बाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत नामदेव, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, वगैरे. विद्यार्थ्यांनी एका विषयांवर स्वहस्ताक्षरात लिहिलेला एक लेख माहिती संकलन वहीमध्ये शेवटी लावणे अनिवार्य आहे. त्यावर २ पैकी प्रोत्साहनपर गुणांची शिफारस मूल्यमापन समितीकडून करण्यात येईल.

## (४) लोकसंख्या शिक्षण मंडळ मार्गदर्शक संहिता

**१. लोकसंख्या शिक्षण मंडळाची उद्दीष्टे:**

अ) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना लोकसंख्या वाढीच्या गतिमानतेची जाणिव करुन देऊन त्यांना वाढत्या लोकसंख्येमुळे निर्माण झालेल्या समस्यांची माहिती करुन देणे.

ब) विद्यार्थ्यांना देशाच्या लोकसंख्याविषयक धोरणाची माहिती करुन देणे. तसेच लोकसंख्या शिक्षण विषयक माहिती देऊन त्यांच्यामध्ये लहान कुटुंबाच्या संकल्पनेविषयी अनुकूलता निर्माण करणे.

क) महाविद्यालयाच्या सभोवताली असलेल्या परिसरातील जनसमुदायाला वाढत्या लोकसंख्येमुळे कुटुंबावर आणि देशावर होणाऱ्या परिणामाविषयी जाणिव निर्माण करुन देणे.

**२. लोकसंख्या शिक्षण मंडळाचे संघटन:**

महाविद्यालयाने कार्यक्रम अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांचे सभासदत्व असलेले लोकसंख्या शिक्षण मंडळ स्थापन करावे. लोकसंख्या शिक्षणमंडळामध्ये विद्यार्थ्यांची नोंदणी करताना साधारणत: निम्मे मुली असाव्यात. मंडळाच्या मदतीने कार्यक्रमांचे आयोजन करावे. कार्यक्रम आयोजनासाठी इतर प्राध्यापकांचा गरजेनुसार आणि त्यांच्या आवडीनुसार सहभाग घ्यावा. महाविद्यालयीन स्तरावर प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली एक सल्लागार समिती गठीत करावी.या समितीने लोकसंख्या शिक्षण विषयक कार्यक्रमांचे आयोजन, नियोजन, देखरेख व मुल्यमापन करावे. सल्लागार समितीच्या महिन्यातून दोन बैठकी व्हाव्यात.

**३. लोकसंख्या शिक्षण मंडळाद्वारे सत्र २०१४–२०१५ मध्ये आयोजित करावयाच्या कार्यक्रमांचे विषय:**

१. सौर उर्जा उपयोगिता
२. जलसंरक्षण आणि जलसंवर्धन
३. साक्षरता
४. पर्यावरण आणि प्रदुषण
५. वाढती लोकसंख्या आणि उपाययोजना
६. विज्ञान व तंत्रज्ञान
७. व्यसनाधिनता

**४. कार्यक्रम आयोजनाचे महाविद्यालयीन स्तरावरील नियोजन**

लोकसंख्या शिक्षण मंडळात सहभागी महाविद्यालयांच्या कार्यक्रम अधिकाऱ्यांनी सहभागी विद्यार्थ्यांचे समान पाच गट करावेत. प्रत्येक गटाला उपरोक्त विषयापैकी एका विषयावरील एक कार्यक्रम महाविद्यालयीन पातळीवर आणि एक कार्यक्रम ग्रामीण अथवा वस्तीपातळीवर आयोजीत करण्याची सूचना देण्यात यावी. प्रत्येक महाविद्यालयामध्ये उपरोक्त पाचही विषयांवर

कार्यक्रमांचे आयोजन करणे आवश्यक आहे. या कार्यक्रमांच्या आयोजनासाठी शैक्षणिक सत्रातील कोणत्याही आठ रविवारी विद्यार्थ्यांनी ग्रामीण अथवा वस्तीपातळीवर कार्य करणे आवश्यक आहे.

५. **कार्यक्रम आयोजित करावयाची माध्यमे:**

उपरोक्त विषयांवर लोकसंख्या शिक्षण मंडळात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांच्या माध्यमातून महाविद्यालयीन पातळीवर, ग्रामीण अथवा वस्तीपातळीवर कार्यक्रमांचे आयोजन पुढील माध्यमांच्या सहाय्याने करण्यात यावे.

१. **स्पर्धा** :वादविवाद, निबंध, वक्तृत्व, चित्रकला, समयसुचक भाषण स्पर्धा, प्रश्नमंजुषा, साहित्य गोळा करण्याची स्पर्धा, संतांच्या कार्यावर वेषभुषा स्पर्धा, इत्यादी.
२. **जहिराती तयार करणे**
३. **रोजगार, व्यक्तिमत्व विकास व जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करणे.**
४. **आठवड्यातुन एकदा प्रौढांचे समुपदेशन, कुटुंब समुपदेशन, घटस्फोटीतांचे समुपदेशन, महिलांचे समुपदेशन कार्यक्रम**
५. **भाषण** :उपरोक्त विषयांवर विविध क्षेत्रातील विषयतज्ञांचे भाषण आयोजित करणे.
६. **दृकश्राव्य साधनांची निर्मिती** :उपरोक्त विषयांवर स्लाइड शो, तक्ते, आलेख इत्यादीची निर्मिती करणे.
७. नाट्य, एकांकिका, पथनाट्ये आयोजित करणे. त्याचबरोबर लोक वाङ:मयाचा उपयोग करुन उपरोक्त विषयांवर भजन, कीर्तन, पोवाडा, वासुदेव, भारुड इत्यादी सादर करणे.
८. उपरोक्त पाच विषयांवर मुद्रीत साहित्य गोळा करुन संकलन करणे.
९. महाविद्यालयाने विस्तारकार्यासाठी दत्तक घेतलेल्या वस्तीमध्ये प्रत्येक घरी जावून वरील विषयांवर जनजागृती करणे. दत्तक घेतलेल्या गावाचे सर्वेक्षण करुन गावाच्या लोकसंख्येचा अभ्यास करणे, दत्तक गावामध्ये उपरोक्त विषयावरील कार्यक्रमांचे आयोजन करणे.
१०. **अहवाल**: लोकसंख्या शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या कार्यक्रमांचा सविस्तर अहवाल संबंधित कार्यक्रम अधिकाऱ्यांनी A4 साइझमध्ये संगणीकृत करुन त्यासोबत आयोजित केलेल्या कार्यक्रमांची छायाचित्रे आणि वृत्तपत्रांच्या कात्रणासह १५ फेब्रुवारी २०१५ पर्यंत प्रौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा विभागाकडे पाठविणे अनिवार्य आहे.

## ५) महिला अध्ययन आणि सेवा केंद्र

### १) महिला अध्ययन आणि सेवा केंद्राची उद्दीष्टे :

महिला सबलीकरणासाठी महाविद्यालयीन व्यासपीठाचा उपयोग व्हावा तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, संसाधने, अध्ययन, अध्यापन आणि संशोधनाद्वारे महिलांच्या समस्यांचे अध्ययन करुन त्या सोडविण्यासाठी विधायक प्रयत्न करण्यात यावेत, या हेतूने महिला अध्ययन आणि सेवा केंद्र कार्यक्रमाची मार्गदर्शक संहिता विभागाच्या स्तरावर स्थापन करण्यात आली आहे. विद्यार्थीनींच्या समस्या, शिक्षण, आरोग्य, सामाजिक दर्जा, कुटुंब कल्याण, रोजगार, राजकारण आणि समाजकारणात महिलांचे स्थान, महिलांवर होणारे अत्याचार इत्यादी महत्वाच्या समस्या महिला विकासासाठी आज हाताळण्याची गरज आहे. महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, प्राचार्य, आणि व्यवस्थापन त्यांच्याकडे संसाधनाच्या मदतीने त्यांचा उपयोग करुन घेवून या समस्यांविषयी महिलांना जागृत करणे हा महत्वाचा उद्देश आहे.

### २) सल्लागार समिती:

खालीलप्रमाणे सल्लागार समिती स्थापन करावी.

| | | |
|---|---|---|
| १. | प्राचार्य | – अध्यक्ष |
| २. | महाविद्यालयातील ३ ते ५ प्राध्यापक | –सदस्य |
| ३. | प्रत्येक वर्गातील एक विद्यार्थीनी प्रतिनिधी | –सदस्य |
| ४. | व्यवस्थापनाचा एक प्रतिनिधी | –सदस्य |
| ५. | डॉक्टर (एक) | –सदस्य |
| ६. | सामाजिक कार्यकर्ता (एक) | –सदस्य |
| ७. | अधिवक्ता (एक) | –सदस्य |
| ८. | सहकार क्षेत्रातील एक व्यक्ती | –सदस्य |
| ९. | मानसशास्त्रातील एक तज्ज्ञ | –सदस्य |
| १०. | प्रसिध्दी माध्यमातील एक व्यक्ती | –सदस्य |
| ११. | महिला प्राध्यापिका (एक) | –सदस्य सचिव |

महिला अध्ययन व सेवा केंद्रात महाविद्यालयातील विद्यार्थी आणि विद्यार्थिनी असावेत. विद्यार्थ्यांमध्ये संशोधनात्मक वृत्ती निर्माण होवून त्यांची विश्लेषण क्षमता वाढावी आणि महिला विषयक प्रश्नांची त्यांना जाणीव होऊन त्यावर उपाययोजना करण्याची क्षमता निर्माण व्हावी या उद्देशाने महिला अध्ययन व सेवा केंद्रामार्फत सत्र २०१५ – २०१६ मध्ये पुढील विषयांवर कार्यक्रमांचे आयोजन करावे.

### ३) आयोजित करावयाच्या कार्यक्रमांचे विषय:

१) स्त्रियांवरील अत्याचार आणि उपाययोजना
२) स्त्री–भृण हत्या आणि सामाजिक जबाबदारी
३) महिलांचे आरोग्य आणि जाणीव जागृती
४) स्त्रियांचा राजकारणातील सहभाग
५) महिलांसाठी कायदेविषयक जाणीव जागृती

### ४) कार्यक्रम आयोजनाचे महाविद्यालयीन स्तरावरील नियोजन:

महिला अध्ययन व सेवा केंद्रात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे कार्यक्रम अधिकाऱ्यांनी समान पाच गट करुन प्रत्येक गटाला एक विषय देण्यात यावा. दिलेल्या विषयावर प्रत्येक गटाने एक कार्यक्रम महाविद्यालयीन पातळीवर आणि एक कार्यक्रम ग्रामीण अथवा वस्तीपातळीवर आयोजीत करावे. त्याकरिता पुढील माध्यमांचा उपयोग करण्यात यावा. प्रत्येक महाविद्यालयामध्ये उपरोक्त पाचही विषयांवर कार्यक्रमांचे आयोजन करणे आवश्यक आहे. या कार्यक्रमांच्या आयोजनासाठी शैक्षणिक सत्रातील कोणत्याही आठ रविवारी विद्यार्थ्यांनी ग्रामीण अथवा वस्तीपातळीवर कार्य करणे आवश्यक आहे.

५) **कार्यक्रम आयोजनाची माध्यमे:**

१. चर्चासत्र, कार्यशाळा, उद्बोधन शिबिरे.
२. स्पर्धा :वादविवाद, निबंध, प्रश्नमंजुषा, साहित्य संकलन, नाट्य, पथनाट्ये चित्रकला इत्यादी.
३. दृकश्राव्य साधनांची निर्मिती.
४. प्रदर्शनी, घरोघरी भेटी, इत्यादी.

६) **अहवाल:** महिला अध्ययन व सेवा केंद्राद्वारे घेण्यात आलेल्या कार्यक्रमांचा सविस्तर अहवाल अधिकाऱ्यांनी A4 साइझ मध्ये संगणीकृत करुन कार्यक्रमांची छायाचित्रे आणि वृत्तपत्रांच्या कात्रणासह, १५ फेब्रुवारी २०१५ पर्यंत प्रौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा विभागाकडे पाठविणे अनिवार्य आहे. कृपया नोंद घ्यावी.

**प्रमाणपत्र अभ्यासक्रम**

- वनौषधी प्रक्रिया : माहीती व मार्केटींग
- सेंद्रिय शेती : विक्री, उत्पादन व मार्केटींग
- बांबु प्रक्रिया
- वन व्यवस्थापन
- Tourist Guide
- Fruits and vegetables process
- Computer Awareness
- Rural level Worker
- Nursing Health and Nutrition
- NGO Management
- Fruits and vegetable process and marketing
- Financial Literacy – Banking
- Adolescent Girls Health
- Montessori
- Spoken English
- Fashion Designing
- Entrepreneurship Development
- Hair and skin Care
- Youth Development Training
- Research Methodology
- **नाट्यशास्त्र**
- **आर्ट ॲंड पेंटींग**

तसेच अन्य प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे व स्वतंत्ररित्या पुरविण्यात येतील.

संचालक
प्रौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा विभाग

# ६) प्रस्ताव (नमुना प्रपत्र)

**१) महाविद्यालयाचे नांव व पूर्ण पत्ता** : ..........................................................................................

..........................................................................................

**२) प्राचार्यांचे नांव आणि** : ..........................................................................................

**दूरध्वनी क्र. व ई–मेल** ..........................................................................................

**३) सुरु करावयाच्या प्रकल्पाचे नांव** :

१) लोकसंख्या शिक्षण ☐

२) महिला अध्ययन व सेवा केंन्द्र ☐

**४) कार्यक्रम अधिकाऱ्याचे नांव** : ..........................................................................................

**संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांक व ई–मेल** ..........................................................................................

**५) प्रकल्पामध्ये एकुण सहभागी विद्यार्थी** :

(कोणत्याही विद्याशाखेतील फक्त प्रथम वर्षाचेच विद्यार्थी यामध्ये सहभागी करण्यात यावे) (सहभागी विद्यार्थ्यांची वर्गनिहाय यादी जोडावी)

१) लोकसंख्या शिक्षण

| मुले | मुली | एकुण |
|---|---|---|
| | | |

२) महिला अध्ययन व सेवा केंन्द्र

| मुले | मुली | एकुण |
|---|---|---|
| | | |

**६) प्रकल्पामध्ये सहकार्य करणाऱ्या महाविद्यालयातील प्राध्यापकांची नांवे**

१) ..........................................................................................

२) ..........................................................................................

३) ..........................................................................................

**७) विस्तार सेवा कार्यक्रमात सहकार्य: करणाऱ्या आपल्या परिसरातील संस्थांची नांवे**

१) ..........................................................................................

२) ..........................................................................................

३) ..........................................................................................

**८) इतर माहिती** :

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

प्राचार्यांची स्वाक्षरी

(सोबत जोडलेल्या नमुनापत्राची प्रत झेरॉक्स करुन घ्यावी

तसेच संबंधीत कार्यक्रम अधिकारी यांचा संक्षिप्त बायोडाटा पाठवावा.